महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचा (Platinum Jubilee Year)
उद्‌घाटन समारंभ दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ सायंकाळी ०५.३० वाजता
विधान भवन, मुंबई.

## मा.श्री.दिलीप वळसे पाटील
## अध्यक्ष, विधानसभा यांचे भाषण

भारताच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासातील एका संस्मरणीय आणि ऐतिहासिक अशा आजच्या सोहळयास उपस्थित असलेल्या भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, माननीय राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन्, माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, माननीय उप मुख्यमंत्री श्री अजितदादा पवार, मा.श्री.देविसिंह शेखावत, त्याच प्रमाणे केद्रींय कृषी मंत्री माननीय श्री शरदचंद्र पवार, केद्रींय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख, लोकसभेचे माजी अध्यक्ष व माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री माननीय श्री. मुकूल वासनिक, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री माननीय श्री. प्रफुल्ल पटेल, ओरिसा राज्याचे राज्यपाल माननीय श्री. मुरलीधर भंडारे, त्रिपुरा राज्याचे राज्यपाल माननीय डॉ. डी.वाय.पाटील, पंजाब राज्याचे राज्यपाल माननीय श्री.शिवराज पाटील, झारखंड राज्याचे राज्यपाल माननीय डॉ. सय्यद अहमद, केंद्रीय कोळसा राज्यमंत्री माननीय श्री. प्रतिक पाटील, केंद्रीय दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री माननीय श्री. मिलिंद देवरा, दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्ष नेते, उपाध्यक्ष व उपसभापती उपस्थित सर्व राज्य मंत्रिमंडळाचे सदस्य, विधानमंडळाचे माजी पीठासीन अधिकारी , विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सन्माननीय सदस्य, माजी सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अध्यक्ष, महापौर, अन्य राज्यातील माननीय पीठासीन अधिकारी,दोन्ही माध्यमांचे प्रतिनिधी तसेच सर्व निमंत्रित. मान्यवर

सर्व प्रथम मी आपणा सर्वांचे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक सुवर्णपान ठरणा-या आजच्या ऐतिहासिक सोहळयात मन:पूर्वक स्वागत करतो.

## ❖ विधानमंडळाचा अमृत महोत्सव व विधानसभेचा थोडक्यात इतिहास

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. गत वर्षीच या राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणजेच राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे.विविध पातळयांवर राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले गेले. वेगळया मराठी राज्याच्या स्थापनेची पन्नाशी हा तसा फार मोठा कालखंड नसला तरी महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी वारसा लाभलेल्या राज्याच्या बाबातीत हा कालखंड महत्वपूर्ण्‍ ठरतो यात दुमत होणार नाही.

राज्याची स्थापना होऊन ५० वर्षेच झाली तथापि राज्याच्या विधिमंडळाला १८६२ पासूनचा इतिहास आहे. या संदर्भात थोडक्यात माहिती घेणे या निमित्ताने उद्‌बोधक ठरेल. सन १८६२ चा विचार करता विधिमंडळाचा घटनात्मक इतिहास हा जवळजवळ १५० वर्षा पूर्वीचा आहे. देशाच्या इतिहासात ही एक नोंद घेण्यासारखी घटना आहे. मुळात या विधानमंडळाचा उगम १८६२ साली ब्रिटीश राजसत्तेच्या काळात झाला.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासात एक अत्यंत महत्वाचा ७५ वर्षाच्या कालखंडाला नुकतीच सुरुवात होऊन विधानमंडळाने अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विधानमंडळाने अत्यंत उल्लेखनीय असे योगदान दिलेले आहे.

सन १८५७ च्या स्वातंत्र्य लंढयानंतर ब्रिटीशांना भारतीय जन भावनेची जाण झाली. याचाच परिणाम म्हणजे सन १८५८ साली इस्ट इंडिया कंपनीची भारतावरील सत्ता संपुष्टात येऊन भारताचा राज्यकारभार थेट ब्रिटीश संसदेमार्फत पाहिला जाऊ लागला.

सन १८५८ साली भारत शासन कायदा पारित करण्यात आला व यामधूनच भारतात जबाबदार शासन पध्दतीचा (RESPONSIBLE GOVT. ) पाया घातला गेला.

या कायद्यान्वये भारत मंत्र्यांच्या व्दारे इंग्लडचा राजा हा भारताचा कारभार पहात असे.

भूतपूर्व मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिलची पहिली बैठक दिनांक २२ जानेवारी १८६२ रोजी मुंबई येथे टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. मुंबई प्राताचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज रसेल क्लार्क हे त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. ही घटना विधानमंडळाच्या घटनात्मक इतिहासात अत्यंत महत्वाची होती यामधूनच विधानमंडळाच्या जडणघडणीला ख-या अर्थाने सुरुवात झाली.

भारत परिषद कायदा १८९२, मोर्ले - मिंटो सुधाराणा आणि भारत परिषद कायदा १९०९-मॉन्टेग्यू चेम्स फर्ड अहवाल व भारत शासन कायदा १९१९ या विधिमंडळाच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे होत.

१९३५ च्या भारत शासन कायदा हा भारताच्या घटनात्मक इतिहासातील अत्यंत महत्वाचा टप्पा असून या कायद्यान्वये प्रथमच संघ राज्यात्मक शासन पध्दती स्वीकारण्यात आली. सन १८६२ ते १९३७ या ७५ वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत सर्वश्री जगन्नाथ शंकर शेठ, जमशेटजी जिजीभाई,सर माधवराव विंचूरकर , रावसाहेब मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, सर फिरोज शहा मेहता, लोकमान्य टिळक,गोपाळकृष्ण गोखले,डॉ.रामकृष्ण भांडारकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, असे दिग्गज सन्माननीय सदस्य लाभले. ज्यांनी आपल्या महान कर्तृत्वाने या विधानमंडळाला अत्युच्चस्थर व प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.

सन १९३५ च्या कायद्यानुसार विधानसभा व विधानपरिषद अशी दोन सभागृहे मुंबई प्रांतात सन १९३७ मध्ये अस्तित्वात आली. दिनांक २० जुलै १९३७ रोजी पुणे येथे कौन्सिल हॉलमध्ये दुपारी २.०० वाजता विधानपरिषदेची पहिली बैठक झाली. दिनांक १९ जुलै. १९३७ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉल येथेच विधानसभेची पहिली बैठक श्री गणेश वासुदेव उर्फ दादासाहेब मावळंकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

## ❖ विधान सभेचे अमूल्य योगदान

विधानसभा संविधानात्मक दृष्टया लोकांनी प्रत्यक्ष मतदानाव्दारे निवडलेली एक व्यापक जनाधार असलेली या संसदीय लोकशाहीमध्ये अत्यंत महत्वपूर्ण अशी संविधानात्मक संस्था आहे.सध्या विधानसभेमध्ये प्रत्यक्ष मतदानाने निवडून आलेले २८८ सदस्य असून राज्यपाल महोदयाव्दारा नियुक्त एक अॅंग्लो इंडियन सदस्य असे एकंदर २८९ सदस्य आहेत.

राज्याच्या एकंदर प्रगती व विकासामधून विधान सभेचे योगदान अमूल्य असे असून जनतेच्या इच्छा आकांक्षाचे प्रतीक असलेले हे एक विशिष्ट असे सभागृह आहे. जनसामान्यांच्या जीवनातील अंघ:कार मिटवून त्यांची सर्वागीण प्रगती साधण्याचे एक साधन म्हणून विधानसभेकडे पाहिले जाते. जनभावनेचे प्रत्यक्ष प्रतिबिंब या सभागृहात उमटते.

या सभागृहाने विविध बाबीत अत्यंत महत्वाचे योगदान दिलेले आहे. प्रामुख्याने धोरण आखणे, कायदे तयार करणे, अर्थसंकल्पाला मंजुरी देणे, विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून प्रशासनावर नियंत्रण ठेवणे व प्रशासनाला दिशा देऊन गतिमान प्रशासनाचे उद्दि्ष्ट साध्य करणे हे या विधानसभेचे प्रमुख कार्य आहे.

या सभागृहाने राज्याच्या एकंदरच जडणघडणीवर मूलगामी परिणाम करणारे अत्यंत महत्वाचे कायदे केलेले आहेत. संविधानाला अभिप्रेत असलेल्या सामाजिक, आर्थिक, न्याय, स्वातंत्र्य,समता,बंधूता ही मूलभूत तत्वे तसेच मार्गदर्शक तत्वांमध्ये उल्लेखलेली सामाजिक व आर्थिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी काही उल्लेखनीय कायदे पारित केलेले आहेत. या कायद्याचा थोडक्यात गोषवारा खालील प्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१
२) महाराष्ट्र कमाल जमीन धारणा अधिनियम
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१
४) महाराष्ट्र कूळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम
५) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७५
६) महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधारणा अधिनियम
७) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम
८) महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५०टक्के आरक्षणाची तरतूद करणारा अधिनियम

विधानसभेने महत्वाचे पथदर्शी कायदे करुन राज्याच्या सर्वांगीण विकासात योगदान दिले हे जेवढे महत्वाचे आहे तेवढेच विधानसभेत चर्चा, ठराव सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. ठराव/प्रस्ताव/लक्षवेधी सूचना/ प्रश्न/ समित्यांच्या शिफारशी / अर्थसंकल्प इत्यादी माध्यमातून प्रशासकीय यंत्रणेला मार्गदर्शन करण्याचे बहुमोल कार्य विधानमंडळे करीत असतात व त्या योगे जबाबदार शासन पध्दतीच्या मूलभूत तत्वांचे पालन केले जाते.

आपणास माहिती असेलच की घटना समितीमध्ये कोणती शासन पध्दती (Form of Govt.) स्वतंत्र भारताने अवलंबवावी याबाबत चर्चा झालेली होती. अमेरिकन अध्यक्षीय शासन पध्दती ही स्थिर स्वरुपाची शासन (Stable system of Govt.) पध्दती होती तर ब्रिटीश संसदीय पध्दती ही जबाबदार शासन ( Responsible form of Govt.) पध्दती होती. घटनाकारांनी भारतीय प्रशासकीय व समाजरचनेचा सांगोपांग विचार करुन स्वतंत्र भारताला योग्य असणारी जबाबदार शासन पध्दतीचा अंगिकार केला. या शासन पध्दतीमध्ये प्रशासन व मंत्री मंडळ हे विधान सभेला म्हणजे पर्यायाने जनतेला जबाबदार असते. ही पध्दती काटेकोरपणे राबविणे ( By letter and spirit ) हे विधानसभेचे फार मोठे योगदान आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेचे या क्षेत्रातील कार्य अवर्णनिय असेच आहे.

२१ सप्टेंबर १९३७ चा प्रौढ मतदानाने निवडून द्यावयाच्या घटना सामितीचा ठराव, ब्रिटीश सरकारने भाराताला युध्द राष्ट्र म्हणून घोषित केले त्याचा निषेध करणारा ठराव, रस्ता वाहतुकीच्या राष्ट्रीयकरणाचा ठराव, कुळवहीवाट व शेत जमिनी विषयी कसेल त्याची जमीन हे तत्व अंगिकारणारा संविधानाला अभिप्रेत असलेल्या आर्थिक न्यायाची अंमलबजावणी करणारा क्रांतिकारक ठराव, आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यासाठी फी माफीची सवलत, मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कामाचा हक्क प्रदान करणारा रोजगार हमीचा ठराव, महिला धोरण, अनुशेष दूर करण्यासंबंधीचा वैधानिक मंडळाच्या स्थापनेचा ठराव, शेतक-यांच्या हिताचे अनेक ठराव, शेतकरी, कामगार, शेतमजूर, अल्पसंख्यांक, मागासवर्गीय ,महिला,बालके या समाजाच्या सर्वच घटकांच्या पुनरुत्थानासाठी विधानसभेत वेळोवेळी झालेल्या उपयुक्त चर्चा या माध्यमातून विधानसभेने केलेल्या कार्याचे वर्णन करण्यास पाने अपुरी पडतील.

धर्मनिरपेक्ष लोकशाही, न्याय, स्वातंत्र, समता, बंधुता या संविधानाच्या चतु:सुत्रीवर आधारित एक नव समाज निर्मितीसाठी विधानसभेचे योगदान कदापि विसरण्या सारखे नाही.

महाराष्ट्र विधीमंडळाने न्याय व्यवस्थेचा नेहमीच सन्मान राखलेला आहे. विधीमंडळ व न्यायालये ही संविधानिक संरचना असून ती लोकशाही संवर्धनाच्या दृष्टीने ऐकमेकांना पूरक अशी

कार्य करतात. संविधानात तत्संबधी सविस्तर तरतुदी आहेतच. विधीमंडळ व न्यायालयात संघर्षाची भुमिका या विधीमंडळाने कधीच घेतलेली नाही. हे मी अभिमानाने नमूद करु इच्छितो. न्यायव्यवस्थेचा योग्य तो सन्मान राखून न्याय व्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने या विधीमंडळाने नेहमीच कार्य केले आहे.

## ❖ विधानसभेच्या वाटचालीतील ठळक घटना

१) १९३५ च्या कायद्यान्वये मुंबई प्रांतात प्रथमच १७५ सदस्य असलेली विधानसभा स्थापन करण्यात आली

२) मतदानाचा अधिकार २१ वर्षावरील व्यक्तीस जरी होता तरी ती व्यक्ती नियमांतर्गत नेमून दिलेले कर, भाडे , शेतसारा इत्यादी भरणारी व कमीत कमी व्हरनॅक्युलर फायनल पर्यत तरी शिकलेली असावी अशी अट होती.

३) युध्द राष्ट्र घोषित केल्याच्या निषेधार्थ दिनांक २५ ऑक्टोबर १९३९ रोजी तीव्र खेद व्यक्त करण्याच्या ठरावानंतर ४ नोव्हेंबर १९३९ राजी खेर मंत्री मंडळाने राजीनामा दिला.

४) १९३५ च्या कायद्यातील कलम ९३ अन्वये गव्हर्नरने सर्व सभा घेतली.

५) मार्च १९४६ च्या निवडणुका होईपर्यत गव्हर्नरांची सभा होती.

६) १९४६ च्या निवडणुकीनंतर ३ एप्रिल १९४६ रोजी खेर मंत्री मंडळाने शपथ घेतली.

हे मंत्रीमंडळ १५ ऑगस्ट १९४७ देश स्वतंत्र झाल्यानंतर व राज्य घटनेच्या तरतुदी प्रमाणे प्रौढ मतदान पध्दतीने स्वतंत्र भारतातील पहिल्या सार्वजनिक निवडणुका होईपर्यत सत्तेवर होते.

७) दिनांक १९ ऑक्टोबर, १९४८ रोजी विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना उद्देशून गव्हर्नर राजा महाराजा सिंग यांनी अभिभाषण केले. दोन्ही सभागृहातील सदस्यांना उद्देशून केलेले हे अभिभाषण या विधानमंडळाच्या इतिहासातील पहिलेच अभिभाषण होय.

८) स्वातंत्र प्राप्ती नंतर पहिले अधिवेशन १० सप्टेंबर १९४७ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये सुरु झाले. सदस्यांना परत स्वतंत्र भारताला उद्देशून शपथ घ्यावी लागली. कारण पूर्वी घेतलेली शपथ ही इंग्लंडच्या राजाला उद्देशून होती.

९) २६ जानेवारी १९५० राजी राज्य घटना अंमलात आली. त्यानंतर विधानसभेचे पहिले अधिवेशन दिनांक १७.२.१९५० रोजी सुरु झाले. यावेळी सदस्यांना घटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागली. अशा पकारे १९४६ च्या निवडणुकीत विधानसभेवर निवडून आलेल्या सदस्यांना एकत्र ३ वेळा शपथ घ्यावी लागली. पहिली शपथ परतंत्र भारतात,दुसरी स्वतंत्र भारतात व तिसरी राज्य घटनेला उद्देशून, विधानसभेच्या इतिहासातील हे स्थित्यंतर केवळ अभूतपूर्व असेच आहे.

१०)राज्य धटना अंमलात आल्यानंतर जानेवारी १९५२ मध्ये प्रौढ मतदान तत्वावर विधानसभेच्या ३१६ जागासाठी प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या. या नवीन विधानसभेचे अधिवेशन दिनांक ३ मे १९५२ रोजी सुरु झाले.

११)घटनेनुसार राज्याचे पहिले मंत्री मंडळ दिनांक २१ एप्रिल १९५२ रोजी मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आले.

१२)५ मे १९५२ रोजी श्री.द.का.कुंटे यांची अध्यक्ष तर एस.आर.कंठी यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली .

१३)१ नोव्हेंबर १९५६ रोजी व्दिभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्यात आली.

१४)व्दिभाषिक राज्य विधानसभेचे पहिले अधिवेशन मुंबईला १९ नोव्हेंबर १९५६ रोजी भरले.

१५)व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सुत्रे हातात घेतली.

१६) दिनांक २१.११.१९५६ रोजी सयाजी सिलम यांची अध्यक्ष म्हणून तर शेषराव वानखेडे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली.

१६)संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी जनतेचे आंदोलन चालूच होते. जनमताच्या रेटयामुळे दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली

१७)१९६० नंतचा इतिहास सर्वज्ञात आहेच.

१९६० नंतरच्या कालावधीत राज्यात १९६२, १९६७, १९७२, १९७८, १९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९९, २००४,२००९ रोजी विधानसभेसाठी सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या.

१९३७ ते २००९ या कालावधीत कार्यरत असणारे माननीय मुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष उपाध्यक्ष, विरोधी पक्ष नेते यांचा कालखंड उल्लेखनीय होता.

## ❖मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री

१) सर धनजीशा बोमनजी कपूर

२) श्री.बाळ गंगाधर खेर

३) श्री.मोरारजी रणछोडजी देसाई

## ❖व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री

१) श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण

## ❖महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री

१) श्री.यशवंतराव बळवंतराव चव्हाण

२) श्री.मारोतराव सांबशिंव कन्नमवार

३) श्री.परशुराम कृष्णाजी सावंत (हंगामी)

४) श्री.वसंतराव फुलसिंग नाईक

५) श्री.शंकरराव भाऊराव चव्हाण

६) श्री.वसंतराव बंडुजी पाटील

७) श्री.शरदचंद्र गोविंदराव पवार

८) श्री.अब्दुल रहेमान अब्दुल गफूर अंतुले

९) श्री.बाबासाहेब भोसले

१०)श्री.शिवाजीराव भाऊराव पाटील - निलंगेकर

११)श्री.सुधाकराव राजूसिंग नाईक

१२)श्री.मनोहर गजानन जोशी

१७) श्री.नारायण तातू राणे

१८) श्री.विलासराव दगडोजीराव देशमुख

१९) श्री.सुशिलकुमार संभाजीराव शिंदे

२०) श्री.अशोक शंकरराव चव्हाण

२१) श्री.पृथ्वीराज चव्हाण

## ❖ विधानसभा अध्यक्ष

१) श्री.गणेश वासुदेव मावळंकर

२) श्री.कुंदनमन सोभाचंद फिरोदिया

३) श्री.दत्तात्रय काशिनाथ कुटे

४) श्री.सयाजी लक्ष्मण सिलम

महाराष्ट्र विधान सभा ( १९६० पासून )

५) श्री.सयाजी लक्ष्मण सिलम

६) श्री.त्र्यंबक शिवराम भारदे

७) श्री.शेषराव कृष्णराव वानखेडे

८) श्री. दौ.श्री. उर्फ बाळासाहेब देसाई

९) श्री.शिवराज विश्वनाथ पाटील

१०) श्री.प्राणलाल हरकिशनदास व्होरा

११) श्री.शरद शंकर दिघे

१२) श्री.शंकरराव चिमाजी जगताप

१३) श्री.मधुकरराव धनाजी चौधरी

१४) श्री. दत्ताजी शंकर नलावडे

१५) श्री.अरुणभाई गुजराती

१६) श्री.कृष्णराव रखमाजीराव देसाई उर्फ बाबासाहेब कुपेकर

१७) श्री.दिलीपराव वळसे-पाटील

## ❖ विधान सभा  उपाध्यक्ष

### मुंबई विधानसभा

१) श्री.नारायणराव गुरुराव जोशी

२) श्री.शनमुगाप्पा निंगाप्पा अंगदी

३) श्री.शिवलिंगाप्पा रुद्राप्पा कंठी

### व्दिभाषिक मुंबई राज्य

४) श्री. शेषराव कृष्णराव वानखेडे

५) श्री.दिनदयाळ गुप्ता

### महाराष्ट्र विधान सभा

६) श्री.दिनदयाळ गुप्ता

७) श्री.कृष्णराव तुकाराम गिरमे

८) श्री.रामकृष्ण ंव्यंकटेश बेत

९) श्री.सय्यद फारुक पाशा

१०) श्री.शिवराज विश्वनाथ पाटील

११) श्री.गजाननराव रघुनाथराव गरुड

१२) श्री.सुर्यकांत जगोबाजी डोंगरे

१३) श्री.शंकरराव चिमाजी जगताप

१४) श्री.कमलकिशोर नानासाहेब कदम

१५) डॉ.पद्मसिंह बाजीराव पाटील

१६) श्री.बबनराव दादाबा ढाकणे

१७) श्री.लक्ष्मण सोनोपंत उर्फ अण्णा जोशी

१८) श्री.मोरेश्वर विठ्ठलराव टेमुर्डे

१९) श्री.शरद मोतीराम तसरे

२०) श्री.प्रमोद भाऊरावजी शेंडे

२१) प्रा.वसंत पुरके

## ❖ विरोधी पक्ष नेते

### मुंबई विधान सभा

१) श्री. सर अली महंमद खान देहलवी

२) श्री.ए.ए.खान

३) श्री.तुळशीदास सुभानराव जाधव

### व्दिभाषिक मुंबई राज्य

४) श्री.एस.एम.जोशी

५) श्री.उध्दवराव साहेबराव पाटील

६) श्री.विठ्ठल देविदास देशपांडे

## ❖ महाराष्ट्र विधानसभा

१) श्री.रामचंद्र धोंडिबा भंडारे

२) श्री.कृष्णराव नारायणराव धुळप

३) श्री.दिनकर बाळू पाटील

४) श्री.गणपतराव अण्णासाहेब देशमुख

५) श्री.उत्तराव लक्ष्मणराव पाटील

६) श्रीमती प्रभा आनंद राव

७) श्रीमती प्रतिभा देविसिंह पाटील

८) श्री.शरदचंद्र गोविंदराव पवार

९) श्री.बबनराव दादाबा ढाकणे

१०)श्री.निहाल अहमद

११) ॲड.श्री दत्ता नारायण पाटील

१२) श्रीमती मृणाल केशव गोर

१३) श्री.मनोहर गजानन जोशी

१४) श्री.गोपीनाथ पांडुरंग मुंड

१५) श्री.मधुकरराव काशिनाथ पिचड

१६) श्री. नारायण तातू राणे

१७) श्री.रामदास गंगाराम कदम

१८) श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)

## ❖ स्वातंत्र्य लढयात महाराष्ट्राचे योगदान

यादवांचे देवगिरीचे राज्य गेल्यानंतर काही शतके आधी या महाराष्ट्रात केवळ अंध:कार पसरलेला होता. या काळात संत ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, गोरा कुंभार, संत तुकाराम, संत रामदास, या संतांनी वारकरी संप्रादायाची पंरपरा तेवत ठेवली व जनतेमध्ये अध्यात्मिक जागृती निर्माण केली. या राज्याजा संत परंपरेचा फार मोठा वारसा लाभला आहे. संत साहित्याने समाजामध्ये फार मोठे जागृतीचे कार्य केले.

त्यानंतर मुगल राजवटीमध्ये अन्याय, अत्याचाराचा कळस होऊन एक प्रकारचा अंध:कारमय जीवन निर्माण झाले होते. हा अंधकार मिटवून समाजाची विस्कटलेली घडी सावरुन एक दैवी कार्य महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी देशाच्या इतिहासात मोठी क्रांती घडवून आणली. मोघलांच्या प्रत्येक आव्हानावर शांत स्थिर आणि गनिमी कावा वृत्तीने मात करून नवा इतिहास रचला. गेली अनेक शतके चालत आलेली भारताची राजकीय विषमता लक्षात घेऊन त्यांनी काळाचे आव्हान स्विकारत सारी परिस्थिती बदलून टाकली "विश्व स्वधर्म सूर्य पाहो" हा ज्ञानेश्वरांचा मंत्र त्यांनी सार्थ करून दाखविला. आपल्या धर्मात दृढ पण इतर धर्माचा समान आदर करणारा, असहिष्णुतेला सतत आव्हान देणारा, शिस्तीचा भोक्ता पण गुणाची कदर करणारा, लढाऊ, पराक्रमी, न्यायनिष्ठुर पण दयाळू अंत:करणाचा कोणत्याही प्रसंगाला न डगमगणारा असा हा थोर महापुरूष भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील अमरत्व पावलेला पराक्रमी महामानवच आहे. हया महापुरूषाने राष्ट्र घडविले. मोघल साम्राज्य संपुष्टात आणून हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारताचा इतिहास आणि नकाशाही बदलून टाकला. महाराजांच्या या अद्वितीय कार्याबद्दल आणि पराक्रमाबद्दल श्रीसमर्थ म्हणतात -

"निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
अंखड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।"

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वाराज्याचा कारभार रयतेसाठी केला त्या आदर्श राज्य कारभाराबद्दल श्रीसमर्थ पुढे म्हणतात -

"शिवरायांचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी।"

या शिवमंत्राने मागे महाराष्ट्र तरला, आज आणि उद्या भारतही तरून जाईल.

महाराष्ट्राला थोर अशा समाजसुधारकाची फार मोठी परंपरा आहे. किंबहुना पुरोगामी राज्याचा पाया या समाजसुधारकांनी घातला आहे. लोकमान्य टिळक, न्या. रानडे, आगरकर, गोखले, महर्षी कर्वे, लोकहितवादी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, यांचे राज्याच्या जडणघडणीमधील योगदान महाराष्ट्र कदापि विसरु शकणार नाही.

महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ राज्यामध्ये १९३० साली सुरु झाली होती .महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली लढलेले हे दुसरे व्यापक आंदोलन होते. सायमन कमिशनची नेमणूक व त्यात भारतीयांना स्थान न दिल्यामुळे भारतीय दुखावले गेले होते. त्यातच त्याकालावधीत निर्माण झालेल्या मंदीमुळे लोक आणखी त्रासून गेले होते. मीरत कटात ३२ साम्यवादी नेत्यांना सरकारने अटक केल्यामुळे कामगारामध्ये असंतोष निर्माण झाला होता या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली होती.

दुस-या महायुध्दाची सुरुवात होताच ब्रिटनने आपण भारतासह युध्दात उतरल्याची घोषणा केली. त्याबाबतीत भारतीयांना विचारणा न केल्यामुळे प्रांतीक मंत्रीमंडळांनी राजीनामे दिले. त्यावेळी महात्मा गांधीनी वैयक्तिक सत्याग्रहाचा मार्ग निवडून सरकारला विरोध करण्याचे ठरविले. त्यावेळी पवनार आश्रमातून विनोबा भावेंना प्रथम अनुयायी निवडून आंदोलनाची सुरुवात केली. त्यानंतर महात्मा गांधींनी चलेजाव चळवळीची सुरुवात केली ८ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय क्रॉंगेसच्या अधिवेशनात या आंदोलनाचा ठराव पारित करण्यात आला. त्यावेळी त्याच रात्री महात्मा गांधींसह महत्वाच्या सर्व नेत्यांना अटक करण्यात आली. राष्ट्रीय नेत्यांना अटक होताच जयप्रकाश नारायण, रामनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, एस.एम.जोशी इत्यादी नेते भुमिगत झाले. चलेजाव चळवळीच्या सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय नेत्यांना अटक केल्यामुळे या चळवळीची नेतृत्व स्थानिक नेत्यांकडे गेले. त्यातूनच काही भागात ब्रिटीश शासन उलथवून टाकून 'प्रतिसरकारांची' स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सातारा सांगली जिल्ह्यात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक प्रतिसरकार स्थापन झाले.

## ❖स्वातंत्र्यप्राप्ती व संयुक्त महाराष्ट्र

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही महाराष्ट्राच्या इतिहासातील एक दैदिप्यमान कालखंड होता. मराठी राज्याच्या स्थापनेसाठी जनतेने उभारलेली ही एक चळवळ राज्याला नवे वळण देणारी ठरली. यात सर्व जनतेने उस्फुर्तपणे भाग घेऊन संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले. एस.एम.जोशी, आचार्य अत्रे, श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट यांच्या कार्यकतृत्वामुळे संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले.

स्वातंत्र्य लढ्यात भाषावार राज्य निर्माण करण्याचे क्रॉंग्रेसचे धोरण होते. मुंबई प्रांतात गुजराथी व कन्नड भाषिक प्रदेश सामाविष्ट होते. विदर्भाचा काही भाग मध्यप्रातांत तर मराठवाडा विभाग हैद्राबाद संस्थानात होता. या सर्व मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून एक राज्य व्हावे यासाठी ४७ नंतर दिर्घकाळ लढा झाला. संयुक्त महाराष्ट्र स्थापन्याकरिता सातत्याने प्रयत्न करता यावा यासाठी महाराष्ट्र क्रॉंगेसचे ज्येष्ठ नेते शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद या सर्व पक्षीय संघटनेची स्थापना करण्यात आली. भाषावार पुनर्रचनेचा विचार करण्यासाठी आयोग नेमावा यासाठी केंद्रीय नेतृत्वावर दबाब वाढत गेला, त्यामुळे केंद्र शासनाला भाषावार प्रांत रचनेसाठी एक आयोग नेमावा लागला.

## ❖संयुक्त महाराष्ट्राची स्थापना

द्विभाषिक मुंबई राज्याच्या भवितव्याचा फेरविचार पक्ष पातळीवर सुरु झाला आणि ४ डिसेंबर, १९५९ रोजी द्विभाषिकांचे विभाजन करण्याचा ठराव केला. पंडित नेहरुनी मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला संमती दर्शविली त्यानंतर संसदेत मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक १९६० ला संमत करण्यात आले. दिनांक १ मे, १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

महाराष्ट्राला संताची पंरपरा खुप मोठी आहे. १२५० ते १२९५ या काळात संत सावतामाळी होऊन गेले. संसार व व्यवसाय करित असतांना सुध्दा ईश्वर भक्ती करता येते त्याचेच प्रतिबिंब सावतामाळी यांच्या अभंगात पडलेले दिसते. या व्यतिरिक्त संत गोराकुंभार, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत जनाबाई, कान्होपात्रा, संत एकनाथ, संत तुकाराम, संत बहिणाबाई, संत रामदास, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इत्यादी होऊन गेले.

## ❖ प्राचीन मराठी साहित्य

मराठी भाषेची उत्पत्ती संस्कृत, प्रकृत, अपभ्रंश व मराठी याप्रमाणे झाले सातव्या शतकापर्यंत मराठी शब्द विविध शिलालेखात सापडतात. अकराव्या शतकात बोलीतून वाक्यात तिचे रुपांतर झाले आणि बाराव्या शतकात मराठी साहित्य रुपाने ग्रंथ रुपाने अवतीर्ण झाले. राज्यात संत वाङ्:मय, शाहिरी वाङ्:मय, बखर वाङ्:मय इत्यादीनी मराठी भाषा समृध्द व संपन्न केली.

## ❖ शिक्षण

शिक्षण हा मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा घटक आहे. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने देखील शिक्षण अत्यंत महत्वाचे ठरते. कुशल मनुष्य बळाची उपलब्धता प्रभावी शिक्षण प्रसारावर अवलंबून असते तर लोकसंख्येच्या गुणात्मक वैशिष्ट्यांमध्ये शिक्षण हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. म्हणूनच शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी स्वातंत्र्यप्राप्तीपासून विविध प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्राचे शिल्पकार मा.यशवंतरावजी चव्हाण व तत्कालीन मुख्यमंत्री. मा.यशवंतरावजी चव्हाण यांच्या संकल्पनेतून आर्थिकदृष्ट्या मागासालेल्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अनेक मोठी संधी मिळत गेली आणि हा वर्ग शिक्षित झाला. महाराष्ट्र हे शैक्षणिकदृष्टया देखील प्रगत व पुढारलेले राज्य गणले जाते. आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांनासुद्धा शैक्षणिक शुल्कात सवलत मिळावी असा महत्वपूर्ण निर्णय आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी घेतला. याबाबतचा दाखला देण्याचा अधिकार त्यांनी सरपंचाना प्रदान केला होता.

## ❖ महाराष्ट्राचे शिल्पकार

भारताच्या मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात लिंगायत, नाथ, महानुभाव, वारकरी इ. धार्मिक आणि अध्यात्मिक संप्रादायांचा उदय झाला. त्यामुळे महाराष्ट्राचा धार्मिक सामाजिक सांस्कृतिक प्रबोधनात मोलाची भर पडली या सर्व संप्रदायात महानुभाव पंथाच्या चक्रधर स्वामींचे विशेष योगदान आहे.

छत्रपती शिवाजी महाराजाचे अलौकिक व दैवी कार्य देश कदापि विसरु शकणार नाही. राज्यामध्ये अहिल्याबाई होळकर, दादाभाई नौरोजी, गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, न्याय. महादेव रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, धोंडो केशव कर्वे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी महाराष्ट्राचे थोर शिल्पकार होऊन गेले.

## ❖ सहकार

सहकार हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे व महाराष्ट्राच्या प्रगतीचे अन्योन्य वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राच्या आजच्या प्रगतीमध्ये सहकारी चळवळीने फार मोठी भूमिका पार पाडली आहे. म्हणूनच सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राने आर्थिक विकासामध्ये खूप मोठी उंची गाठली. १९६० ते १९८० हा काळ महाराष्ट्रामध्ये सहकाराचा सुवर्ण काळ म्हणून गणला जातो. महाराष्ट्रामध्ये विठ्ठलराव विखे-पाटील व धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकारातून १९५० मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा नगर येथे पहिला साखर कारखाना स्थापन करण्यात आला.

आज देशात महाराष्ट्र कृषी व औद्योगिक क्रांतीचा प्रणेता म्हणून ओळखला जातो. कृषी उद्योग, पाठबंधारे, दळणवळण, माहिती व तंत्रज्ञान, ऊर्जा, शिक्षण, गृह निर्माण, नागरी विकास, महिला व अल्पसंख्यांकाचा विकास, मागासवर्गीयांचे कल्याण, याक्षेत्रात राज्य हे अग्रेसर असून यामध्ये महाराष्ट्र विधीमंडळाच्या महत्वाचा वाटा आहे. साहित्य, कला, संस्कृति क्रिडा या क्षेत्रात महाराष्ट्राचे योगदान केवळ अपूर्व आले आहे.

## ❖ साहित्य - संस्कृती - क्रिडा

भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले, दिवगंत भीमसेन जोशी या सारखे महान कलावंत तसेच सचिन तेंडुलकर, सुनिल गावस्कर, तेजस्विनी सावंत, धनराज पिल्ले, अंजली भागवत यासारखे क्रिडापटू राज्याची ओळख जागतिक पातळीवर देत आहे. त्याबरोबरच साहित्य व संस्कृती क्षेत्रात तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे, विंदा करदींकर, आचार्य अत्रे, नारायण सुर्वे आदींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

विधानमंडळाचा अमृत महोत्सव ही एक ऐतिहासिक घटना असून भारताच्या घटनात्मक इतिहासात या विधानमंडळाचे स्थान व दर्जा एक विशिष्ट असा आहे. राज्यालाच नव्हे तर देशाला दिशा देण्याचे कार्य या पुरोगामी विधानमंडळाने केलेले आहे. एक उदाहरणच द्यावयाचे तर रोजगार हमी योजनेच्या कायद्याचे तसेच माहितीच्या अधिकाराच्या कायद्याचे देता येईल. हे दोन्ही कायदे देशपातळीवर मार्गदर्शक कायदे म्हणून स्वीकारले गेले. महाराष्ट्राने १९६० पासून राबविलेली सत्तेचे विकेन्द्रीकरणाचे तत्व म्हणजेच पंचायती राज संकल्पना विविध राज्यांनी राबवलीच नव्हे तर भारतीय संविधानाच्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून देश पातळीवर राबवली गेली.या सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र विधानमंडळाचे योगदान हे अनन्यसाधारण स्वरुपाचे आहे यात दुमत होणार नाही.

## ❖ राष्ट्रपती महोदयांची उपस्थिती हा दुग्धशर्करा योग

विधानमंडळाचा अमृत महोत्सव आज महाराष्ट्र कन्या व महाराष्ट्र विधानमंडळात सदस्या, मंत्री व विरोधी पक्ष नेते या विविध पदांवर प्रदिर्घ काळ कार्यरत असणाऱ्या महामहिम राष्ट्रपती महोदया श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभ हस्ते साजरा होत आहे. हा एक दुग्ध शर्करा योग आहे.

## ❖ स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्त विविध उपक्रम

महाराष्ट्राचे शिल्पकार व माजी मुख्यमंत्री व भारताचे उप पंतप्रधान स्व.यशवंतरावजी चव्हाण हे महाराष्ट्राचे भाग्यविधाते होते. राज्याच्या विकासाचा पाया त्यांनी त्यांच्या अथक प्रयत्नाने घातला. शेती आणि औद्योगिक क्षेत्र यांना परस्पर पूरक बनवून राज्याचा विकास साधण्याची तसेच पंचायत राज संस्थातील सत्तेच्या विकेंद्रीकरणाची फळे ग्रामपातळीवर पोहचवून एक सक्षम असे नेतृत्व घडविण्याचे किमया त्यांनी साधली. दुसऱ्या बाजूला सहकारी संस्था निर्माण करुन एक विस्तृत असे जाळे त्यांनी निर्माण केले. नवे कृषी धोरण, कसेल त्याची जमीन हा शेतकरी हिताचा कायदा, साहित्य संस्कृति कला यांचे संगोपन व संवर्धन करणाऱ्या विविध योजना आखून त्या राबविणे हे त्यांचे योगदान महाराष्ट्र कदापि विसरू शकणार नाही. एक अत्यंत सुसंस्कृत, साहित्यीक व्यक्तिमत्व म्हणून श्री.यशवंतराव देशभर परिचित आहेत. अशा या थोर महाराष्ट्राच्या शिल्पकाराची जन्म शताब्दी वर्ष विधीमंडळामार्फत मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. विधीमंडळाची त्यांच्या थोर व्यक्तिमत्वाला दिलेली ही आदरांजलीच असेल.

वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत विधान मंडळ ते ग्रामपंचायतीपर्यंत निवासित सदस्यांना प्रशिक्षण देण्याची योजना आहे तर विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांना कार्यप्रणाली त्या त्या क्षेत्रात जाऊन दाखवून देण्याची आमची संकल्पना आहे. कै.यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना मांडली होती. त्यात काम करणाऱ्या लोक नियुक्त सदस्याचे प्रशिक्षण होणे हे आता महत्वाचे आहे. कै. यशवंतराव चव्हाण वर्ष शताब्दी वतीने हा कार्यक्रम राबवावयाचा आहे.

## ❖ आगामी उपक्रमांचे सूत्रबद्ध नियोजन

या विधानमंडळात वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राची स्थापना करुन विधीमंडळ ते ग्रामपातळीवरील विविध स्तरावरील लोकप्रतिनिधी म्हणजेच सरपंच, ग्रामपंचायतीचे सदस्य, पंचायत समिती व जिल्हा परिषदांचे पदाधिकारी, नगरपालिका व महानगरपालिकांचे पदाधिकारी यांची अभ्यास शिबीरे घेऊन संसदीय लोकशाहीविषयी स्वयंपूर्ण अशी माहिती देणे व ते उत्तम लोकप्रतिनिधी कसे होतील या विषयी त्यांना मार्गदर्शन करुन याबाबत विशेष लक्ष देण्याचे ठरविले आहे.

## ❖ विधानमंडळाचे संगणकीकरण

आजच्या या संगणक युगात विधीमंडळाचे संगणकीकरण अत्यंत आवश्यक झाले आहे. Paperless Office ची संकल्पना प्रत्यक्ष उतरवण्यात येत आहे. यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात आलेले असून ही कल्पना लवकरच मुर्त स्वरुपात अस्तित्वात येईल. यामुळे सदस्यांना घर बसल्या ई-मेल द्वारे विविध संसदीय आयुधांच्या सुचना विधीमंडळ सचिवालयाला पाठविता येतील. तसेच ई-बुक तयार करण्याचे काम सुध्दा प्रस्तावित आहे.

शिवाय महाविद्यालय, हायस्कूल, माध्यमिक व प्राथमिक शाळा या शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थ्यांना विधानमंडळाचे दैदिप्यमान कार्य, संसदीय लोकशाही प्रक्रिया भारतीय संविधान, सुप्रशासन, इत्यादी विषयी तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे हा सुध्दा या कार्यक्रमाचा एक उद्देश आहे.

नागपूर येथील विधान भवन निसत्र काळात विनावापर असून या वास्तूचा वर्षभर उपयोग करुन या केंद्राच्या माध्यमातून विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थ्यांसाठी एक कायम स्वरुपाचे संसदीय प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा सुध्दा मानस आहे.

## ❖ स्वतंत्र प्रसारण वाहिनीचा प्रस्ताव

आजच्या माहिती व तंत्र ज्ञानाच्या युगात विधीमंडळाचे कामकाज जनसामान्यापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. दुर्देवाने विधीमंडळाच्या कामकाजाला पुरेसे महत्व दिले जात नाही. विधी मंडळात कित्येक लोकाभिमुख कायदे पारीत होतात, राज्याच्या धोरणविषयक प्रश्नांवर सखोल व अभ्यासपूर्ण चर्चा होते. अर्थसंकल्पाची सखोल छाननी केली जाते. समिती पध्दतीच्या माध्यमातून प्रशासनावर अंकुश ठेवून शासनाच्या धोरणाला दिशा दिली जाते. मात्र या संसदीय कार्याला पुरेशी प्रसिध्दी न देता फक्त नकारात्मक दृष्टीकोन बाळगून अवांतर बाबींना अवाजवी प्रसिध्दी दिली जाते. हे टाळण्यासाठी लोकसभेच्या धर्तीवर विधीमंडळाची एक स्वतंत्र वाहिनी सुरु करण्याचे आम्ही योजिले आहे.

१८६२पासून सुरू झालेला विधानमंडळाचा इतिहास नव्या पिढीला विस्ताराने माहित करून देण्यासाठी विविध प्रकाशने, ग्रंथ विधानमंडळातर्फे प्रसिद्ध केले जाणार आहे. या कालखंडातील विधीमंडळातील महत्वाच्या घटनांची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी व त्या काळातील लोकप्रतिनिधींनी केलेल कार्य त्याची माहिती नव्याने जनतेसमोर मांडण्याची आज गरत आहे. कारण इतिहास पुन्हा पुन्हा वाचल्याने त्याचे अर्थ अधिक उलगडत जातात. यासाठी महाराष्ट्र विधीमंडळाचा इतिहास या ग्रंथाच्या निर्मितीची योजना आखण्यात आली आहे यासाठी एक समितीही गठीत करण्यात आली आहे ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या अध्यक्षतेखाली ते संपादकीय मंडळ काम करीत आहे या मंडळाने गेल्या ७५ वर्षातील निवडक ७५ भाषणांचा संग्रह असलेला "नोंदी" हा ग्रंथ तयार केला आहे. या कामात संपादक मंडळाला पूर्णपणे विषयाची निवड करण्याचे पूर्णपणे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. समारोपाच्या प्रसंगी नोंदी या ग्रंथाचा आणखी एक भाग व सदस्यांच्या आठवणीचा संग्रह असलेला स्मृतीगंध जो आज एक भाग प्रकाशित केला आहे तसाच समारोपाप्रसंगी आणखी एक भाग प्रकाशित केला जाईल. अनेक मान्यवरांनी स्मृतीगंधसाठी लेख पाठविले आहे. सर्वांना या ग्रंथात स्थान देता आले नाही कारण दोन्ही ठिकाणी ७५ हा आकडा आम्हाला कायम ठेवायचा होता त्यामुळे जे शक्य झाले नाही ते आम्ही पुढच्या वेळी निश्चित पुर्ण करु.

## ❖ आभार

विधीमंडळाच्या या अमृत महोत्सवी वर्षात माझ्या सारखा एक लहान कार्यकर्ता अध्यक्षांचे पद भुषवितो हे माझ्या जिवनातील मोठी उपलब्धी आहे. या विधीमंडळाने मला आमदार, मंत्री व दादासाहेब मावळणकरांपासून आज पर्यंत थोर पंरपरा असलेल्या विधीमंडळाचे अध्यक्ष पद दिले व या त्यायोगे या संसदीय लोकशाहीची सेवा करण्याचे सुवर्ण संधी प्राप्त करुन दिली हे मी माझे महत भाग्य समजतो.

या अमृत महोत्सवी वर्षात आमच्या विनंतीला मान देऊन आपण सर्व लोकप्रतिनिधी या सोहळ्यात सहभागी झालात याबद्दल आपले शतश: आभार व्यक्त करुन आपली रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !